कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/कविवि/आराकप//२०२५–२६/१८७५
दि.११/०२/२०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित आर्टिस्ट विभागातील स्पर्धात्मक स्वरुपाचे राज्य कला प्रदर्शन २० ते २४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अकादमीच्या आर्ट गॅलरीत (कला दालनात) आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणा-या कलाकारांसाठी निर्धारित नमुन्यातील प्रवेशिका नियमावलीसह कला अकादमीच्या स्वागत कक्षात तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवर विनामूल्य उपलब्ध आहे. सदर प्रवेशिका कलाकृतीसह दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १.०० वाजता व दुपारी २.०० ते ४.०० च्या दरम्यान कला अकादमीच्या आर्ट गॅलरीत (कला दालनात) स्वीकारण्यात येतील.

उपरोल्लेखित मुदतीनंतर आलेल्या अथवा अपूर्ण स्वरुपातील प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत याची इच्छुक कलाकारांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळविले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)